प्रयास-सेवांकुर द्वारा आयोजित

स्पार्क २०१४ (वर्ष ५ वे)

जिंकण्यासाठी स्वतःला घडवूया

निवासी व्यक्तिमत्व विकास शिबिर

(वर्ग ९ ते १२ च्या विद्यार्थ्यांसाठी)

दि. १ ते ८ एप्रिल २०१४ **स्थळ :** प्रयास–सेवांकुर भवन, राजापेठ, अमरावती

शिबिर मार्गदर्शक : **डॉ. अविनाश सावजी** (एमबीबीएस)

तुमच्या मुलांनी जीवनात आजवर जे काही मिळविलेले आहे, त्यापेक्षा कितीतरी जास्त मिळविण्याची क्षमता व ऊर्जा त्यांच्यामध्ये आहे; पण ती अव्यक्त स्वरूपात (सुप्तावस्थेत) आहे व बरीचसी अज्ञातसुध्दा आहे. त्यांच्यामधील या प्रचंड प्रमाणात दडून असलेल्या व आतापर्यंत न वापरलेल्या अव्यक्त ऊर्जेचा उपयोग, त्यांचे स्वत:चे व समाजाचे जीवन समृद्ध करण्यासाठी होऊ शकतो. गरज आहे ती फक्त एखाद्या ठिणगीने ही ऊर्जा चेतविण्याची ! म्हणजेच एका स्पार्कची ! ही ठिणगी पडून या ऊर्जेने पेट घेतला की झाले ! जीवनाच्या गाडीने गती पकडलीच म्हणून समजा. अशी ठिणगी टाकून, या उन्हाळी सुट्यांमध्ये तुमच्या मुलांमध्ये असलेली ही अव्यक्त ऊर्जा सृजनात्मक व सकारात्मक पद्धतीने चेतविण्यासाठी **स्पार्क २०१४** हे शिबिर !

'जिंकण्यासाठी' स्वत:ला तयार करण्यासाठी आपल्या गुणांचा, शक्तिस्थानांचा व क्षमतांचा सतत शोध घ्यावा लागतो, त्यांना प्रयत्नपूर्वक विकसित करावे लागते; तर दोषांना ओळखून जाणीवपूर्वक दूर करावे लागते. **स्पार्क २०१४** शिबिरामध्ये सहभागी शिबिरार्थींना प्रत्यक्ष अनुभवाद्वारे, 'जिंकण्यासाठी' स्वत:ला घडविण्याच्या मार्गावर अग्रेसर होता येईल.

शिबिरार्थींना विचार करायला प्रवृत्त करणारा, आत्मपरीक्षण करायला भाग पाडणारा, जाणिवा व संवेदनशीलता तीक्ष्ण करणारे हे कृतिपर संस्कारशील शिबिर आहे. आज सर्वत्र चालू असलेली मार्कांची स्पर्धा व शर्यतीला पूर्णपणे बाजूला सारून 'जिंकण्यासाठी' स्वत:चा शोध घेण्याचा हा आनंददायी उपक्रम आहे. सर्वत्र होणाऱ्या व्यक्तिमत्व विकास शिबिरांपेक्षा या शिबिराचे स्वरूप खूपच वेगळे असेल.

शिबिराचे स्वरुप : फार टाईट वेळापत्रक वा जाचणारी शिस्त नसेल. सकाळी ७–११ या वेळात ठरलेली सत्रे होतील. संध्याकाळचा पूर्ण वेळ प्रत्यक्षात विविध असाईनमेंटस् पूर्ण करण्याचा असेल. दुपारचा पूर्ण वेळ वाचन, खेळ, मुक्त चर्चा यासाठी असेल. प्रत्यक्ष कृतिपूर्ण अनुभव देणाऱ्या विविध असाईनमेंट्स शिबिरार्थी स्वत: पूर्ण करतील व त्या प्रत्येक असाईनमेंट्मधून काय शिकलेत यावर चर्चा व विश्लेषणद्वारा विचारांची स्पष्टता व प्रगल्भता आपोआपच येईल.

शिबिराचा उद्देश : शिबिरातून घरी परतलेल्या आपल्या मुलांमध्ये स्पष्टपणे जाणवेल याप्रकारचे वर्तन परिवर्तन झालेले पालकांना दिसेल. तसेच अनेक बाबतीत त्यांच्यामध्ये वैचारिक स्पष्टता पण वाढलेली दिसेल.

- ✓ आयुष्याचे ध्येय कसे ठरवावे, करिअर कसे व कोणते निवडावे, ठरविलेले ध्येय गाठण्यासाठी स्वत:ला कसे तयार करावे? स्वत:च्या गुण–दोषांचा शोध कसा घ्यावा, गुणांचे संवर्धन व दोषांचे निराकरण कसे करावे ?
- ✓ मानसिक बळ व आत्मविश्वास कसा वाढवावा ? वेळेचे सुयोग्य व्यवस्थापन कसे करावे ?
- ✓ वाचन, डायरी लेखन, मुलाखती घेणे
- ✓ आहार, व्यायाम विषयक संकल्पनांबाबत स्पष्टता येण्यासाठी प्रात्यक्षिके.
- ✓ पुस्तके विकणे, आपल्यापेक्षा गरजू व दु:खी लोकांचा शोध घेणे, विविध संस्था व उपक्रमांना भेटी.

सुचना :

१. **शिबिराच्या नोंदणीसाठी नोंदणी अर्ज भरून पाठवावा. शिबिरार्थी व त्याच्या पालकांनी असे दोन वेगवेगळे फॉर्मस् भरायचे आहेत.**

२. **शिबिरादरम्यान शिबिरार्थींना जाणीवपूर्वक काही अडचणी व आव्हानांना सामोरे जावे लागेल अशी शिबिराची रचना केलेली आहे, जेणेकरून शिबिरार्थींनी थोडेसे रफ ॲन्ड टफ बनावे.**

३. दि. १ एप्रिलला सकाळी १० पर्यंत अमरावतीला खालील पत्त्यावर पोहचावे. दि. ८ एप्रिलला सायंकाळी शिबिर संपेल.

४. **सोबत काय आणावे :** स्वत:चे कपडे व अन्य आवश्यक सामान, दोन बेड शीट्स, उन्हासाठी डोक्याला बांधायला स्कार्फ/टोपी, पाण्याची बॉटल, वही–पेन, टूथपेस्ट, साबण इ.

५. शिबिर सहभाग देणगी शुल्क : रू. ३०००/– (भोजन–निवास व्यवस्थेसह)

प्रयासच्या खालीलपैकी कोणत्याही बँक खात्यामध्ये नगदी वा चेकद्वारा आपण शिबिर सहभाग देणगी शुल्क जमा करू शकता.

Bank Account Details of PRAYAS

1. **PRAYAS**- Saving bank A/No. - 323302010064340 at Union Bank of India, Amravati Branch. (**IFS Code UBIN0532339)**
2. **PRAYAS Chandur Bazar**- Saving bank A/No.-11590669883 at SBI, Chandur Bazar Branch. (**IFS Code SBIN0002147)**
3. **PRAYAS Chandur Bazar**- Saving bank A/No.-042801001011 at ICICI, Amravati Branch. (**IFS Code ICIC0000428)**

==========

संपर्क : **प्रयास–सेवांकुर भवन,** दंडे प्लॉटस्, बोंडे हॉस्पिटलच्या जवळ, राजापेठ, **अमरावती**

फोन 0721-2573256, 94207 22107 Email : sevankur@gmail.com

Website : www.prayas-sevankur.org Blog : prayas-sevankur.blogspot.com